# तुझे प्रेम

तुझे प्रेम, त्याचा आवेग
त्या आवेगात मी वाहून गेलो!

तुझे प्रेम, त्याचा वेगवान भोवरा
त्या भोवऱ्यात चक्रावून गेलो

तुझे प्रेम, त्याचा मंद सुवास
त्या गंधाने वेडावून गेलो

तुझे प्रेम, त्याचा हवासा स्पर्श
अंगभर काटे मोजीत गेलो

तुझे प्रेम, त्याची बेधुंद मस्ती
धुंदीत मी मलाच विसरून गेलो

तुझे प्रेम, त्याचा दिव्य प्रकाश
त्याच्या झोतात दिपून गेलो

तुझे प्रेम, त्याचा मूक दिलासा
आंतरिक शांती अनुभवून गेलो.

By: Abhay B. Joshi